# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**अत्यंत तातडीचे/महत्वाचे**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/३०८/२०२०
दिनांक : ७/१०/२०२०

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग.

**विषय : उन्हाळी-२०२० परीक्षांच्या संचालनाबाबत**

संदर्भ : १) शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१७
२) परिपत्रक क्रमांक संगाबाअवि-३/संपमूमं/२७६/२०२०, दिनांक १२.०९.२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कोविड-१९ च्या पार्श्वभूमिवर संदर्भ क्रमांक १ वरील शासन निर्णयानुसार उन्हाळी-२०२० च्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने व ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देणे शक्य नसेल, अशा विद्यार्थ्यांच्या ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घ्यावयाच्या आहेत.

शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठाद्वारे संदर्भ क्रमांक २ नुसार परीक्षा संचालनासंदर्भात परिपत्रक काढण्यात आले आहे. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन पद्धतीने परीक्षा द्यावयाची आहे, अशा विद्यार्थ्याबाबतची माहिती महाविद्यालयांकडून मागविण्यात आलेली आहे. आपल्या महाविद्यालयाकडून प्राप्त यादीनुसार आपणांस सदर विद्यार्थ्यांची ऑफलाईन परीक्षा घ्यावयाची आहे. याकरीता प्राचार्यांच्या ई-मेलवर प्रश्नपत्रिका पाठविण्यात येतील. तसेच महाविद्यालयांकडून प्राप्त परीक्षार्थ्यांच्या संख्येनुसार OMR Sheet च्या प्रती महाविद्यालयास पुरविण्यात येत आहे.

तथापि, या व्यतिरिक्त सुद्धा काही विद्यार्थी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देण्याकरीता ऐनवेळी त्यांचे सोयीनुसार नजिकच्या महाविद्यालयात परीक्षा देण्याकरीता येवू शकतात. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हिताच्या दृष्टीने सदर महाविद्यालयात विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे क्रमप्राप्त ठरते.

ऐनवेळी परीक्षा देण्याकरीता महाविद्यालयात उपस्थित होणाऱ्या परीक्षार्थ्यांचे व्यवस्थेचे दृष्टीने महाविद्यालयांनी विद्यापीठाद्वारे जाहिर वेळापत्रकानुसार परीक्षेसंदर्भातील पूर्वतयारी करुन ठेवणे गरजेचे आहे. वेळापत्रकामध्ये जाहिर केलेली तारीख व वेळेनुसार महाविद्यालय सुरु राहतील, याची दक्षता प्राचार्यांनी घ्यावयाची आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठाद्वारे प्राचार्यांचे ई-मेल वर प्रश्नपत्रिका पुरविण्यात येईल, तसेच आपल्या महाविद्यालयातील ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सद्यःस्थितीत निरंक असली तरी तांत्रिक कारणांमुळे ऐनवेळी महाविद्यालयांमध्ये ऑफलाईन परीक्षा देण्याकरीता येवू शकतात, ही बाब लक्षात घेता, महाविद्यालयांना OMR Sheet च्या १०० प्रती पुरविण्यात येत आहेत. सदर परीक्षा कालावधीत महाविद्यालयांचे प्राचार्य हे केंद्राधिकारी म्हणुन जबाबदारी सांभाळतील, तसेच आवश्यकतेनुसार पर्यवेक्षकांची नियुक्ती करतील.

कोविड-१९ च्या पार्श्वभूमिवर सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाद्वारे निर्गमीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. अपवादात्मक परिस्थितीत आरोग्य विषयक काही अडचणी उद्भवल्यास अशा महाविद्यालयांना वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत संबंधित जिल्हाशल्यचिकित्सकांना विद्यापीठाद्वारे कळविण्यात आले आहे.

आपणाकडून सहकार्य अपेक्षित आहे.

धन्यवाद.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ